Sound Square Technologies Ltd
Don't expect the obvious

**Date** 05-12-2023

**HeadLine:** Kalpataru gets massive projects from abroad

**Newspaper:** Pudhari

**Language:** Marathi

**Journalist:**

**Edition:** Pune

**Page No.** 8 **Position:** Centre **Height:** 10 **Column:** 1

# कल्पतरूने मिळवल्या २,२६३ कोटींच्या ऑर्डर

**नवी दिल्ली :** अभियांत्रिकी, ऊर्जा अशा विविध क्षेत्रांत विस्तारलेल्या कल्पतरु प्रोजेक्ट्स इंटरनॅशनल लिमिटेडला (केपीआयएल) २,२६३ कोटी रुपयांची कामे मिळविण्यात यश आले आहे. केपीआयएलने शेअर बाज-राला सोमवारी ही माहिती सादर केली.



वीज वितरण प्रणाली सेवा देणाऱ्या ट्रान्समिशन अँड डिस्ट्रीब्युशन कंपनीला भारतीय आणि विदेशी बाजारपेठेतून १,५६४ कोटी रुपयांची कामे मिळाली आहेत. जलसेवाविषयक कंपनीला ४५८, बिल्डिंग अँड फॅक्टरी कंपनीला २४१ कोटी रुपयांची कामे मिळाली आहेत.

केपीआयएल कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मनिश मुहनोत म्हणाले, वीज वितरण व्यवसायाची मोठी ऑर्डर आम्हाला मिळाली आहे. देशासह लॅटीन अमेरिका, आफ्रिका आणि स्वीडनमधील कामे कंपनीला मिळाली आहे. यंदाच्या आर्थिक वर्षात कंपनीने १४,४४१ कोटी रुपयांची कामे मिळवली आहेत. त्यात वाढच होत आहे.

radar

Business Critical Information